महाराष्ट्र शासन
शिक्षणाधिकारी (योजना), जिल्हा परिषद, नाशिक
शासकीय कन्या विद्यालय आवार, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, नाशिक - ४२२००१
ई मेल - eoschemenashik@gmail.com

---

जा.क्र शियोजिपना/ सयोअ/ उल्लास नवभारत/२०२६/203/206. दि. 9 / ६/२०२६

प्रति,

१. गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती सर्व, जि. नाशिक

२. प्रशासन अधिकारी, मनपा
नाशिक व मालेगाव

**विषय** - उल्लास- नवभारत साक्षरता कार्यक्रम (ULLAS NBSK) अंतर्गत FLNAT असाक्षर उद्दिष्ट पूर्ण करणेबाबत..

**संदर्भ** - १. मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), म. रा. पुणे यांचे पत्र दि. २१/०४/२०२६.
२. मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत दिलेल्या सूचना दि. २२/०५/२०२६.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये केंद्र पुरस्कृत उल्लास- नवभारत साक्षरता कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यामध्ये सन २०२२-२३ ते सन २०२६-२७ या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना नुसार सुरु आहे. संदर्भिय पत्रान्वये आपणास तालुकानिहाय उद्दिष्टे वितरित करण्यात आले आहे.

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम यांनी दि. २२/०५/२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार तात्काळ उल्लास ॲपवर नोंदणी करण्यासाठी आपल्या विकास गटातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना खालील प्रमाणे सूचना देण्यात याव्यात.

१. प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांनी सर्वेक्षकांची नेमणूक करुन त्याची नोंदणी उल्लास ॲपवर आपल्या शाळेच्या लॉगिन मधुन करावी.
२. सर्वेक्षक म्हणून त्या परिसरातील सर्व जिल्हा परिषद, मनपा/ नपा व खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित, स्वंयअर्थसहाय्यित प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी, कनिष्ठ महाविद्यालयात व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण घेणारे विद्यार्थी / एन.एस.एस/ एन.सी.सी/ नेहरु युवा संघटन या योजनेत सहभागी विद्यार्थी / अंगणवाडी सेविका/ आशा कार्यकर्त्या / उमेद कार्यकर्त्या यांची नेमणूक करावी.
३. सर्वेक्षकांची नेमणूक व उल्लास ॲपवर नोंदणी झाल्यावर त्यांच्या माध्यमातुन सर्वेक्षण करुन शाळेच्या मुख्याध्यापकांनी उपरोक्त सामाजिक घटकांची मदत घेऊन आपल्या परिसरातील १०० टक्के असाक्षर व्यक्तीची ( १५ वर्ष वयावरील सर्व ) नोंदणी उल्लास ॲपवर करावी.
४. उल्लास ॲपवर नोंदणी झालेले असाक्षर व्यक्ती व सर्वेक्षक यांचे टॅगिंग लगेच करुन घ्यावे.
५. असाक्षर व्यक्तींचे प्रशिक्षण वर्ग सर्वेक्षकांमार्फत सुरु करावे. सुरु झालेल्या वर्गांची माहिती मुख्याध्यापकांनी गटशिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी यांच्या मार्फत शिक्षणाधिकारी (योजना) या कार्यालयास वेळोवेळी सादर करावी.
६. आपल्या जिल्ह्यातील जनगणनेचे काम सुरु झाले असून यात प्रगणक म्हणून आपल्या शाळेमधील शिक्षकांची नेमणुक झालेल्या सर्व शिक्षकांच्या माध्यमातुन जनगणने संदर्भात गृहभेटी करतांना असाक्षर

Scanned with OKEN Scanner

व्यक्तींची खालील नमुन्यात माहिती प्राप्त करुन घ्यावी. सदर माहिती उल्लास ॲपवर असाक्षरांची नोंदणी करण्यास उपयुक्त आहे त्यामुळे सर्वेक्षणाच्या कामास गती येईल.

**नवभारत साक्षरता कार्यक्रम (NILP)**
**असाक्षर व्यक्तींचे सर्वेक्षणाबाबत माहिती**

**शाळेचे नाव ------------------------------------------ URC-१/URC-२------------**
**शाळेचा पत्ता - ---------------------------------------- युडायस नंबर - ---------------**
**मुख्याध्यापकाचा मो. नं-**

| अ.क्र | स्वंयसेवकाचे नाव | असाक्षर व्यक्तीचे पूर्ण नाव | संपुर्ण पत्ता | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

**(टीप- १५ वर्ष व त्यावरील वयोगटातील व्यक्ती ज्यांना लिहिता वाचता येत नाही त्यांना असाक्षर गृहीत धरुन अशा व्यक्तींची नोंदणी करावी.)**

**मुख्याध्यापक शिक्का व सही**

**७. तालुकानिहाय उद्दिष्ट खालील प्रमाणे-**

| अ.क्र | तालुका | सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील उद्दिष्टे |
|---|---|---|
| १ | बागलाण | २९१८ |
| २ | चांदवड | ८०० |
| ३ | देवळा | ९५० |
| ४ | दिंडोरी | ५१४८ |
| ५ | इगतपुरी | ३२९० |
| ६ | कळवण | १८४० |
| ७ | मालेगाव मनपा | १३६४० |
| ८ | मालेगाव | २३७६ |
| ९ | नांदगाव | ३५४८ |
| १० | नाशिक | २७९२ |
| ११ | नाशिक मनपा | १०३८२ |
| १२ | निफाड | ५२९० |
| १३ | पेठ | १२०२ |
| १४ | सिन्नर | ३६२६ |
| १५ | सुरगणा | २७५६ |
| १६ | त्र्यंबकेश्वर | ६९२ |
| १७ | येवला | ४२२२ |
| | **एकूण** | **६५४७२** |

**दिलेले असाक्षर नोंदणी उद्दिष्टे दि. १५/०८/२०२६ पर्यंत पूर्ण करावे.**

**(सरोज जगताप)**
**शिक्षणाधिकारी (योजना),**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर -**

१. मा. शिक्षण संचालक(योजना), शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे
२. मा. शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक

Scanned with OKEN Scanner